महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ सोमवार, ४ डिसेंबर २०१७

# 'नवमहाराष्ट्र'मध्ये 'जाणीव जागृती'



**पिंपरीतील नवमहाराष्ट्र विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी नुकताच जाणीव जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**

**पुणे :** पंख संस्था, क्विकहील फाउंडेशन आणि रयत शिक्षण संस्था यांच्या तर्फे पिंपरीतील नवमहाराष्ट्र विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी नुकताच जाणीव जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पोलिस उपनिरीक्षक रत्ना सावंत आणि पवन पाटील या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, क्विकहील फाउंडेशनचे कॉर्पोरेट सोशल कॉर्पोरेट रिस्पॉन्सिबिलिटी विभागाचे प्रमुख अजय शिर्के, 'पंख'च्या विश्वस्त सीमा ननावरे, नवमहाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तमराव पाटील आणि मुख्याध्यापिका शारदा जाधव उपस्थित होत्या.

सावंत आणि पाटील यांनी मुलांना छेडछाड, विनयभंगासंदर्भातील कायद्यांबाबत मार्गदर्शन केले. भारतातील मुली सक्षम असून त्यांनी अनुचित प्रकार घडल्यास पोलिसांची मदत कशी घ्यावी, याची माहिती देण्यात आली. मुलींची छेड काढणे, रॅगिंग, विनयभंग असे प्रकार घडल्यास कोणते गुन्हे दाखल होतात, किती शिक्षा होते याची माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरेही देण्यात आली.

पंख आणि क्विकहील फाउंडेशन या संस्था मागील पाच वर्षांपासून कार्यरत असून या संस्थेअंतर्गत मुख्यतः जीवनमूल्य शिक्षण आणि शाळांगण समुपदेशन केंद्र हे दोन प्रकल्प राबवले जातात. रयत शिक्षण संस्थेच्या एकूण १६ शाळांमध्ये जीवनमूल्य शिक्षण तर एकूण १० शाळांमध्ये शाळांगण समुपदेशन केंद्र उपक्रम चालतात, याच अंतर्गत जाणीव जागृती कार्यक्रम घेण्यात आला, असे आपटे यांनी सांगितले.